**आर बी आय / २००६-०७/१७१**

संदर्भ क्रमांक डीजीबीए.सी.डी.डी. क्र. एच-७६६७/ १५.१५.००१/२००६-०७    नोव्हेंबर १०, २००६

महाव्यवस्थापक,
शासकीय लेखा
विभाग प्रधान कार्यालय,

स्टेट बँक ऑफ इंडिया/स्टेट बँक ऑफ इंदोर/स्टेट बँक ऑफ पतियाळा /स्टेट बँक ऑफ बिकानेर अँड जयपूर/स्टेट बँक ऑफ सौराष्ट्र /स्टेट बँक ऑफ त्रावणकोर/स्टेट बँक ऑफ हैद्राबाद/स्टेट बँक ऑफ म्हैसूर/अलाहाबाद बँक /बँक ऑफ बरोडा/बँक ऑफ इंडिया/बँक ऑफ महाराष्ट्र/ कॅनरा बँक/ सेंट्रल बँक ऑफ इंडिया/कार्पोरेशन बँक/देना बँक / इंडियन बँक/इंडियन ओव्हर्सिज बँक/पंजाब नॅशनल बँक /सिंडिकेट बँक/युको बँक / युनियन बँक ऑफ इंडिया / युनायटेड बँक ऑफ इंडिया / विजया बँक/ आय सी आय सी आय बँक लि.

प्रिय महोदय

**वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४ अंतर्गत देय व्याजावरील टी डी एस - बँकांकडून फॉर्म १५ एच व १५ जी न स्वीकारले जाण्याबाबत**

कृपया आमचे परिपत्रक आर बी आय / २००५-०६/ ४३१ संदर्भ क्र. डी जी बी ए . सीडीडी. क्र. एच- २०६९२/ १५.१५/००१/ २००५-०६ दिनंक जून २८, २००६ चा संदर्भ घ्यावा. त्यात वरिष्ठ नागरिक बचत योजना, २००४ वरील टी डी एस संबंधित प्रश्नांबाबतची स्पष्टीकरणे आपणास पाठविली गेली होती.

२. आम्हाला, भारत सरकारच्या नवी दिल्ली येथील अर्थ मंत्रालयाकडून आलेल्या पत्रानुसार त्यांच्याकडे, प्रतिनिधी बँकांकडून फॉर्म १५ जी किंवा १५ एच न स्वीकारण्याबाबत तक्रारी अजूनही येत आहेत आणि प्रतिनिधी बँका, खातेदाराने हे फॉर्म भरुन दिले असताना सुद्धा व्याजाच्या रकमेतून आयकर वसूल करतात. म्हणून

३. आम्ही पुनश्च कळवीत आहोत की, भारत सरकारच्या कार्यालयीन ज्ञापन क्र. २/९/२००५- एन एस-II दिनांक जून २३,२००६ (प्रत जोडली आहे) मध्ये नियम केल्याप्रमाणे, ठेवीदाराने फॉर्म १५ एच किंवा फॉर्म १५ एफ भरल्यास किंवा आय कर अधिनियम १९६१ च्या कलम १९७(१) खाली प्रमाणपत्र दिल्यास (जशी बाब असेल त्यानुसार) प्रतिनिधी बँकांनी मूळ स्त्रोतातून कर वसूली (टी डी एस) करू नये.

४. या परिपत्रकातील मजकूर माहिती व मान्यतेसाठी आपल्या बँकेच्या नियत केलेल्या शाखांच्या नजरेस आणावा.

५. कृपया पोच द्यावी.

आपला विश्वासू
(बी बी संगमा )
महा व्यवस्थापक